| | |
|---|---|
| MHKO140005852026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७७/२०२६**<br>संदीप नारायण नेवगिरे<br>**वि.**<br>महाराष्ट्र सरकार तर्फे, पोलिस निरीक्षक, चंदगड पोलिस ठाणे, चंदगड ता. चंदगड, जि. कोल्हापूर |

**निशाणी क्र.१ खालील आदेश**
**(दिनांक– ०२/०७/२०२६)**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा सहिंता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, त्यांना टेलेग्रामवर एक लिंक आलेली होती. त्यामध्ये त्यांना टास्क पुर्ण करणेचा होता. त्याप्रमाणे अर्जदार यांनी टास्क पुर्ण करुन पैसे जिंकले. त्यानंतर आरोपीने यातील अर्जदाराला पैसे गुंतविणेस सांगितले. अर्जदाराने त्याच्यावर विश्वास ठेऊन त्या व्यक्तीला रक्कम पाठविली. त्याबाबत अर्जदार यांची फसवणुक झालेबाबत चंदगड पोलिस ठाणे येथे तक्रार केलेली आहे. पोलिस ठाणे यांचे सांगण्याप्रमाणे त्यांनी सायबर क्राईम पोर्टल येथे ॲकनॉलेजमेंट नं.३१९१०२५०१८२५३३, दिनांक ०१/१०/२०२५ रोजी तक्रार नोंदविलेली आहे. अर्जदार यांची एकूण रक्कम रु.७,०००/– ची फसवणुक झालेली आहे आणि त्यापैकी खाते नं.७१४९०२०१०००११०८, युनियन बॅक ऑफ इंडिया, रु.७०००/– इतकी रक्कम सायबर शाखेच्या अधिकारी यांनी गोठवलेली आहे. सबब. सदर रक्कम ही चंदगड पोलिस ठाणे मार्फत सायबर गुन्हे शाखा, कोल्हापूर यांनी गुन्हयाच्या कामी जप्त केलेली आहे. सदर रक्कम अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. सरकापक्षातर्फे सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. सदर टेलेग्रामवर एक लिक आलेबाबत कथन केले आहे पण ती कोणती लिंक याबाबत तसे कधी म्हणजेच नेमक्या कोणत्या तारखेला याबाबत कुठेही कसलाही मजकुर नमूद नाही तसेच कसला टास्क होता की ज्याच्यासाठी अर्जदाराने रक्कम गुंतवले याबाबत नमूद नाही त्यामुळे अर्जाबाबत शंका निर्माण होते. तसेच अर्जदार यांच्या

कोणत्या बॅकेच्या खातेवरुन किती रक्कम गेली याबाबत अर्जात नमूद नाही. त्यामुळे संबंधीत तपासी अधिकारी व संबंधीत बॅक अधिका–यांचे म्हणणे घेऊनच योग्य तो आदेश करावा ही विनंती केली आहे. तपासी अधिकारी यांनी लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सायबर फसवणुकी संदर्भात अर्जदार यांनी वरीलप्रमाणे तक्रार एन.सी.सी.आर.पी. वर दिनांक ०१/१०/२०२५ रोजी दाखल केली असून अर्जदार यांची फसवणुकीतील रक्कम विविध बॅक खात्यामध्ये स्लीप्ट होवून पुढे व वळत्या झालेल्या असून त्या गोठविण्यात आलेल्या आहेत. अर्जदार यांना सदर गोठविण्यात आलेल्या रक्कमा योग्य त्या अटी व शर्तीवर परत देण्याची त्यांची काही एक हरकत नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जासोबत अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदाराच्या कथनावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांनी सायबर क्राईम पोर्टलवर त्यांच्यासोबत आर्थिक गैरव्यवहार झालेबाबतची तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रार अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच सदर तक्रार अर्जाची प्रत अर्जदार यांनी दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, सदर तक्रारीच्या अनुशंगाने अर्जदार यांच्याकडून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टलमध्ये मनी ट्रेल असुन त्यामध्ये पोर्टलमधील संबंधीत नोडल अधिकारी यांनी अर्जदार यांचे व्यवहाराबाबत रक्कम ही होल्ड करुन ठेवलेली आहे. सदर रक्कम ही अर्जदार यांची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम अर्जदारास योग्य अटी व शर्तीवर देणे आवश्यक आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे, कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे व्यवहारातील अर्जदाराच्या खात्यावर होल्ड करुन ठेवलेली रक्कम रु.७,०००/– ही अर्जदार यांना बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा– तुडीये, शाखा– चंदगड, जि. कोल्हापूर यांचे बचत खाते नं.६०३७२६४८२२४ या खात्यावर जमा करणेबाबत संबंधीत बॅकेस कळवावे.

३) अर्जदार यांनी रक्कम रुपये १०,०००/– चा सुपूर्तनामा हमीपत्र/ indemnity bond लिहून द्यावा.

ASHATAI NARAYAN SARAK Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK Date: 2026.07.02 17:32:45 +0530

**दिनांक : ०२/०७/२०२६** **( ए. एन. सरक )**
**चंदगड** **प्रभारी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.१)**
**चंदगड.**